# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं. ५७/२०१८

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती अश्विनी शिवदास शिंदे | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲंड टेक्नॉलॉजी, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली<br>२. संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली | } | वि. प |

अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली यांचेकडील सहाय्यक प्रा. श्रीमती अश्विनी शिवदास शिंदे, यांचा दि.०२/०२/२०१८ रोजी समितीकडे तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी सदर महाविद्यालयात माझा परिविक्षा कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतर पुर्णतः बेकायदेशीररित्या माझी सेवा समाप्त करण्यात आली. या सेवासमाप्ती विरूद्ध मी अपिल नं. ५/१७ (S) दि. २३ जून २०१७ मे. विद्यापीठ न्यायाधिकरण पुणे, येथे दाखल केले होते. माझे अपिल मंजूर झाले व न्यायालयाच्या आदेशानुसार मी सध्या सेवेत आहे. १. मी वारंवार लेखी व तोंडी विनंती करून ही मला अध्यापनाचे काम आजतागायत दिलेले नाही. २. सन २०१३-१४ पासून देय असणाऱ्या कामाच्या वेतनवाढ केवळ कागदोपत्री दिले असून प्रत्यक्षात ही रक्कम अदा केलेली नाही. ३. विद्यापीठ परिक्षेकडे सुपरवायझर, पर्यवेक्षक व इतर स्वरूपांचे केलेल्या कामाचे मानधन २०१३ ते आजअखेर पर्यंत देण्यात आलेले नाही. केवळ बिलांवर आमच्या सहया घेतलेल्या आहेत. ४. मी सद्या Ph.D चा अभ्यास करत आहे. माझ्या इतर सहकाऱ्यांना Ph.D चा अभ्यास करण्यासाठी जे लाभ उदा. गाईडला भेटण्यास रजा देणे, महत्वाच्या कॉन्फरन्ससाठी डयुटी लिव्ह देणे, कोणत्याही कार्यशाळेस जावू न देणे इ. दिले जातात ते मला दिले जात नाहीत. ५. न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार रूजु झाल्याने मानसिक त्रास देण्यात येत आहे. उदा. स्टाफ मिटिंगची माहिती न देणे, स्टाफ मिटिंगला न बोलावणे, इतर सहकाऱ्यांना माझ्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवणेसाठीच्या सुचना देणे. एकूणच वाळीत टाकण्याचा प्रकार घडला आहे व घडत आहे. त्यामुळे प्रचंड

मानसिक ताण व त्रास होत आहे. ६. सन २०१७ मध्ये पार पडलेल्या निवडणुकीमध्ये अधिसभेसाठी मतदार होण्यास मी पात्र असूनही केवळ अकसापोटी माझे नांव विद्यापीठाकडे न पाठवता मला मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले. ७. नियमाप्रमाणे महागाई भत्ता दिलेला नाही सध्या प्रत्यक्षात ८०% महागाई भत्ता कागदोपत्री देण्यास येत असून प्रत्यक्षात मात्र ५८% दिला जात आहे. महागाई भत्यातील कट केलेली रक्कम परस्पर कोणत्या खात्यात जमा केली जाते त्याची माहिती दिली जात नाही. लेखी विनंती करूनही शेरा दिला जात नाही. ८. तसेच विद्यापीठ अथवा कॉलेजची इतर कोणतीही जबाबदारी ज्याचा फायदा आमच्या पुढील काळातील बढतीसाठी होऊ शकतो असे कोणतेही काम दिले जात नाही. जेणेकरून माझे नुकसान होत आहे.

**संस्था/महाविद्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारीतील मुद्या क्रं.१ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- श्रीमती शिंदे अश्विनी शिवदास या आमच्या महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्यूनिकेशन इंजिनिअरिंग (व्दितीय पाळी) या विभागामध्ये सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत होत्या. सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून टप्याटप्याने बंद करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.१९/१०/२०१६ च्या शासन निर्णयानुसार परवानगी दिलेली आहे. तसेच एआयसीटीई व शिवाजी विद्यापीठाने देखील परवानगी दिलेली आहे. तसेच एआयसीटीई व शिवाजी विद्यापीठाने देखील परवानगी दिलेली आहे. यामुळे सदर अभ्यासक्रम २०१६-१७ पासून टप्याटप्याने बंद होवून सन २०१९-२० मध्ये पूर्ण बंद झालेला आहे. सदर शासन निर्णयाची, एआयसीटीई निर्णयाची व शिवाजी विद्यापीठ निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. सदर अभ्यासक्रमाचा कार्यभार कमी झालेने दि.०८/०४/२०१७ रोजी श्रीमती शिंदे यांना भारत सरकारने सुरू केलेल्या नॅशनल लिव्हलीहूड मिशन ची समन्वयक म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. परंतू सदर जबाबदारी स्विकारणेस श्रीमती शिंदे यांनी नकार दिला. तोपर्यंत सदर शैक्षणिक जबाबदारी वाटपाचे काम पुर्ण झालेले होते. त्यामुळे श्रीमती शिंदे यांना सन २०१७-१८ साली कार्यभार देता आला नाही. परंतू सन २०१८-१९ साली श्रीमती शिंदे यांना पुनश्चः उपलब्ध कार्यभार देण्यात आलेला आहे.

तसेच संस्थेकडून प्रतिनिवेदनामध्ये दिलेल्या माहितीमध्ये महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिग (व्दितीय पाळी) हा अभ्यासक्रम एआयसीटीई, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या मान्यतेने बंद करण्यात आलेला आहे. सबब कार्यभार उपलब्ध नसल्यामुळे श्रीमती शिंदे यांना दि. ०६/०७/२०१९ पासून कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. तक्रारदार यांनी मे.विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे अपिल क्रं. १३/२०१९ (एस) ने दाद मागीतली आहे तसेच सदर याचीका प्रलंबित आहे.

तक्रारीतील मुद्या क्रं.२ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- सन २०१३-१४ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडीटेशन, (एनबीए), नवी दिल्ली यांचे

मानांकन प्राप्त नसल्याने एकूण प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली होती. त्यामुळे संस्थेचे होत असणारे कमकुवत आर्थिक आरोग्य लक्षात घेता, वेतनवाढी योग्य त्या वेळी देता आल्या नाहीत.

परंतु तद्नंतर महाविद्यालयातील काही अभ्यासक्रमांना एनबीए कडून मानांकन प्राप्त झाले असल्याने महाविद्यालयातील एकुण प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये हळूहळू वाढ होत गेली. या नंतर संस्थेने सर्व प्रलंबित देय असणा-या वेतनवाढी दिलेल्या आहेत. प्रलंबित वेतनवाढी खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | महिना | मुळ पगार | वेतनवाढ |
|---|---|---|---|
| १. | ऑगस्ट १३ | २१६००/- | ----- |
| २. | ऑगस्ट १४ | २१६००/- | दिलेली नाही |
| ३. | ऑगस्ट १५ | २१६००/- | दिलेली नाही |
| ४. | ऑगस्ट १६ | २३६१०/- | ३ वेतनवाढी दिलेल्या आहेत. |
| ५. | ऑगस्ट १७ | २३६१०/- | दिलेली नाही. |
| ६. | ऑगस्ट १८ | २५०५०/- | २ वेतनवाढी दिलेल्या आहेत. |

तक्रारीतील मुद्दा क्रं.३ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- विद्यापीठाच्या सुपरवायझर, पर्यवेक्षक व इतर स्वरूपाचे केलेल्या कामाचे मानधन अदा करण्यात आलेले आहे. तसेच सदर बिलाचे ऑडिट करून तसा अहवाल त्या त्या वेळी विद्यापीठाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यासोबत Vouchers/Remuneration Bill Form/Certificate of Remuneration इ. कागदपत्रे जोडली आहेत.

तक्रारीतील मुद्दा क्रं.४ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- महाविद्यालयामध्ये कार्यरत असणा-या सर्व प्राध्यापकांना त्यांच्या गरजेनूसार डयूटी लिव्ह देण्यात येतात.श्रीमती शिंदे यांना त्यांच्या विनंती अर्जावरून खालील प्रमाणे मागील ३ वर्षामध्ये डयूटी लिव्ह देण्यात आलेल्या आहेत. सन २०१६-१७ मध्ये २७ मंजूर डयूटी लिव्ह, २०१७-१८ मध्ये २५ मंजूर डयूटी लिव्ह, २०१८-१९ मध्ये २५ मंजूर डयूटी लिव्ह. त्याच्या पृष्ठार्थ कागदपत्रे (Leave Record) जोडले आहे.

तक्रारीतील मुद्दा क्रं.५ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- महाविद्यालयातील प्रत्येक विभागाने प्राध्यापकांच्या मिटींगचा आठवडयातील ठराविक दिवस व वेळ (उदा.बुधवार दुपारी ४.१५ वा.) सत्राच्या सुरूवातीलाच ठरवलेली असते. व त्याप्रमाणेच प्रत्येक आठवडयामध्ये त्या दिवशी मिटींग होत असते. त्यामुळे प्रत्येक मिटींगसाठी माहिती व निरोप देणे गरजेचे नाही अचानक बोलविलेल्या मिटींगची माहिती व निरोप सर्व प्राध्यापकांना दिला जातो. श्रीमती शिंदे या न्यायाधिकरणाच्या दि.०५/०५/२०१७ च्या आदेशानूसार रूजू झालेल्या आहेत. त्यांना तद्नंतरच्या सर्व मिटींगची माहिती व निरोप वेळेत मिळालेले आहेत हे सोबत जोडलेल्या मिटींग रजिस्टरच्या छायांकित प्रतीवरून दिसून येत आहे. काही मिटींगला जाणीवपूर्वक हजर राहिलेल्या नाहीत. श्रीमती शिंदे यांच्याशी कोणताही संबध न ठेवण्याच्या सूचना महाविद्यालयातील कोणत्याही स्तरावरून देण्यात आलेल्या नाहीत. श्रीमती शिंदे यांचा हा आरोप आम्हास

मान्य नाही. श्रीमती शिंदे यांना इतर प्राध्यापकांप्रमाणेच महाविद्यालयातील सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्यांना बसण्यासाठी स्वतंत्र केबिन व वायफाय, इंटरनेटची सोय दिलेली आहे. त्यामुळे वाळीत टाकलेचा आरोप पूर्ण चूकीचा आहे.

तक्रारीतील मुद्दा क्रं.६ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- शिवाजी विद्यापीठाच्या दि.३०/०६/२०१५ च्या पत्रानुसार अधिसभेसाठी पदवीधर मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे ही पदवीधर व्यक्तिची वैयक्तिक जबाबदारी असून महाविद्यालयाशी त्याचा कोणताही संबध नाही. तसेच महाविद्यालयाने दि.२४/०९/२०१९ रोजीच्या प्रतिनिवेदनामध्ये तक्रारदार यांचे नाव कळविल्याचे नमूद केले आहे व विद्यापीठाकडून यांच्या नावाचा संभाव्य मतदार यादीमध्ये समावेश करावयाचा राहून गेला असावा असे मत व्यक्त केले आहे.

तक्रारीतील मुद्दा क्रं.७ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- या महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग (व्दितीय पाळी) हा अभ्यासक्रम एआयसीटीई, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या मान्यतेने बंद करण्यात आलेला आहे. सबब कार्यभार उपलब्ध नसल्यामुळे श्रीमती शिंदे यांना दि. ०६/०७/२०१९ पासून कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. पगारातील फरकाची रक्कम श्रीमती शिंदे यांना धनादेश क्र. ०४७२७६ व्दारे दि.३०/०८/२०१९ रोजी देण्यात आलेली आहे.

तक्रारीतील मुद्दा क्रं.८ बाबत संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- या महाविद्यालयामध्ये कार्यरत असणा-या सर्व प्राध्यापकांना जबाबदारीची कामे दिली जातात विद्यापीठामार्फत सोपविल्या गेलेल्या जबाबदारीच्या कामासाठी उदा पेपर सेटींग, पेपर तपासणे, भरारी पथक इत्यादी श्रीमती शिंदे यांना महाविद्यालयाकडून डयूटी लिव्ह मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारीमधील मुद्दा क्र. १ बाबत समितीकडून संस्थेचा लेखी अभिप्राय अवलोकनी घेतला असता, संस्थेने तक्रारदार यांना न्यायाधिकरणाच्या निकालानंतर पुनश्चः उपलब्ध कार्यभार देण्यात आला असल्याचे कथन केले आहे. तथापी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग (व्दितीय पाळी) हा अभ्यासक्रम एआयसीटीई, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या मान्यतेने बंद करण्यात आलेला आहे व कार्यभार उपलब्ध नसल्यामुळे श्रीमती शिंदे यांना दि. ०६/०७/२०१९ पासून कार्यमुक्त करण्यात आलेले आहे असे कथन केले आहे. सबब तक्रारदार यांना संस्थेने कार्यमुक्त केल्यामुळे हा मुद्दा समितीच्या विचारार्थ राहत नाही.

२. तक्रारीमधील मुद्दा क्र. २ बाबत संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये सन २०१३-१४, २०१४-१५, मधील वेतनवाढ प्रलंबित ठेवल्याचे संस्थेने मान्य केले आहे. तसेच संस्थेतर्फे तक्रारअर्जास देण्यात आलेल्या

प्रतिनिवेदनामध्ये संस्थेने तक्रारदार यांची सन २०१६-१७ मधील वेतनवाढ प्रलंबित ठेवल्याचे मान्य केले आहे. प्रलंबित वेतनवाढीबाबत दिलेल्या तक्त्यानुसार सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, या तीनही वेतनवाढी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये देण्यात आलेल्या आहेत. परंतू त्या पुर्वलक्षी प्रभावाने देण्यात आलेल्या नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. २०१६-१७ व २०१७-१८ मधील रोखलेल्या दोन्ही वेतनवाढी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये देण्यात आल्या परंतू त्यापुर्वलक्षी प्रभावाने दिलेल्या नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सबब समितीचे असे मत झाले की, तक्रारदार यांना सन २०१३ ते सन २०१८ पर्यंत देण्यात आलेल्या वेतनवाढीचा फरक पुर्वलक्षी प्रभावाने मिळणे आवश्यक आहे.

३. तक्रारीतील मुद्या क्रं. ३ बाबत संस्थेने तक्रारदार यांना विद्यापीठाच्या सुपरवायझर, पर्यवेक्षक व इतर स्वरूपाचे केलेल्या कामाचे मानधन अदा करण्यात आलेले आहे तसेच सदर बिलाचे ऑडिट करून तसा अहवाल त्या त्या वेळी विद्यापीठाकडे पाठविण्यात आलेला आहे असे नमूद केले आहे. त्यासोबत Vouchers/Remuneration Bill Form/Certificate of Remuneration इ. कागदपत्रे जोडली आहेत. समितीने सुनावणी दरम्यान तक्रारदार यांना याबाबत प्रलंबित बिलांची काही कागदपत्रे उपलब्ध असतील तर ती सादर करावयास सांगितले असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडे ते उपलब्ध नसलेचे सांगितले. समितीने तक्रारदार यांना महाविद्यालयामध्ये जाऊन रजिस्टर/रेकॉर्ड पडताळून माहिती घेण्यास सांगितले तसे निर्देश संस्था व महाविद्यालयास ही देण्यात आले. तक्रारदार यांनी याबाबतची पडताळणी करून यासंदर्भात महाविद्यालयाकडून देय असणारी रक्कम आपणास मिळाल्याचे समितीसमोर सांगितले त्यामुळे हा मुद्या समितीच्या विचारार्थ उपस्थित होत नाही.

४. तक्रारीमधील मुद्या क्र. ४ बाबत तक्रारदार यांचे प्रतिनिवेदनामध्ये संस्था व महाविद्यालयाकडून मंजूर केलेल्या रजा पीएच.डी. कामाकरिता रजा नाकारलेचे कथन केले आहे. मंजूर रजा या विद्यापीठ परीक्षेतील कामासाठी व औद्योगिक भेटीसाठी व महाविद्यालयाच्या कामासाठी उपभोगलेल्या रजांची आकडेवारी असून पीएच.डी. करणेकरिता कार्यरत रजा सवलत दिलेली नाही असे तक्रारदार यांनी प्रतिपादन केले आहे.

जाबदार/संस्था यांनी या पृष्ठार्थ जोडलेले (Leave Record) कागदपत्रांवरून त्यामधील काही रजा पीएच.डी. कारणाकरिता दिसून येतात. शिक्षकांना पुढील शैक्षणिक किंवा पीएच.डी.करिता संस्था व महाविद्यालय यांनी उत्तेजन देणे आवश्यक आहे. त्याकरिता लागणारी कार्यरत मंजूर रजा संस्था व महाविद्यालय यांनी देणे आवश्यक आहे. तथापी तक्रारदार असे समितीसमोर पुरावे देवू शकली नाही की, त्यांचे ठरावीक तारखांचे अर्ज संस्थेने विनाकारण नाकारलेले आहेत. तसेच आता त्यांची संस्थेने दि.०६/०७/२०१९ पासून सेवासमाप्ती केली असल्यामुळे आता या मुद्यावर काही आदेश देणे क्रमप्राप्त नाही व हा मुद्या समितीच्या विचारार्थ राहत नाही.

५. तक्रारीमधील मुद्या क्र. ५ बाबत दोन्ही पक्षांचे म्हणणे अवलोकनी घेता समिती या मताची आहे की, संस्था/महाविद्यालय व शिक्षक यांचेमध्ये सलोख्याचे संबंध असणे आवश्यक. संस्था व महाविद्यालयीन प्राचार्य यांची भूमिका महत्त्वाची असते. महिला शिक्षिका यांना सन्मानाची व सुरक्षित वातावरणामध्ये काम करायला देणे ही संस्था व महाविद्यालयाची जबाबदारी आहे. तसेच शिक्षक म्हणून संस्था व महाविद्यालय यांचे प्रति आदर राखणे तसेच दिलेली कामे आणि विद्यार्थी हिताकरिता देण्यात आलेल्या शैक्षणिक जबाबदारी पूर्ण करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे. संस्था व महाविद्यालयातील सर्व शिक्षकांसोबत मिटींग नोटीसीद्वारे कळविण्यात येण्याची दक्षता महाविद्यालयाने घ्यावी. तथापी संस्थेने तक्रारदार यांची सेवासमाप्ती केल्यामुळे हा मुद्या समितीच्या विचारार्थ उपस्थित होत नाही.

६. तक्रारीमधील मुद्या क्र. ६ बाबत संस्थेकडून समितीसमोर दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये दि.२०/०६/२०१५ रोजीचे विद्यापीठास दिलेले पत्र व त्यासोबत जोडलेली यादी अवलोकनी घेतली असता, तक्रारदार यांनी विद्यापीठाच्या २०१७ मधील अधिसभेच्या निवडणूकीकरीता शिक्षक यादीबाबत तक्रार केली आहे व महाविद्यालयाने सन २०१५ मधील शिक्षक यादीबाबत माहिती दिली आहे. महाविद्यालयाने सन २०१७ मधील अधिसभेच्या निवडणूकींकरीता शिक्षक यादीबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा दिलेला नाही. सबब विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार विहीत कालावधीत शिक्षकांची यादी विद्यापीठास सादर करणे ही सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची आहे. वास्तविक विद्यापीठास सादर करण्यात येणारी शिक्षकांची यादी ही महाविद्यालयाने तपासून देणे ही महाविद्यालयाची सर्वस्वी जबाबदारी आहे. सबब असा प्रकार पुनश्चः घडू नये याची दक्षता घ्यावी. तथापी तक्रारदार यांची सेवासमाप्ती केल्यामुळे याबाबत कोणतेही निर्देश संस्थेस देणे योग्य राहणार नाही.

७. तक्रारीमधील मुद्या क्र. ७ बाबत संस्थेकडून दिलेल्या खुलाश्यामध्ये तक्रारदार यांच्या पगारातील फरकाची रक्कम धनादेश क्रं.०४७२७६ दि.३०/०८/२०१९ रोजी धनादेशाव्द्वारे देण्यात आलेली आहे. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना जो महागाई भत्ता अदा केला जातो तसाच श्रीमती शिंदे यांना अदा करण्यात येतो त्यामध्ये कोणताही भेदभाव केला जात नाही असे प्रतिपादन करण्यात आले आहे. याच्या पृष्ठार्थ पगारपत्रकाची सत्यप्रत समितीसमोर दाखल केली.

याबाबत समितीच्या निदर्शनास आले की, तक्रारदार यांनी तक्रारअर्जात संस्थेने ८० % महागाई भत्ता कागदोपत्री दिला असून प्रत्यक्षात ५८ % दिला असल्याची तक्रार केली आहे. पुढे प्रतिनिवेदनामध्ये तक्रारदार यांनी या समितीसमोर तक्रार दाखल केल्यानंतर दोन महिन्यांमध्ये ८० % दराने महागाई भत्ता अदा केल्याचे लेखी म्हणणे दिले आहे. सबब तक्रारदाराने तक्रारीमध्ये नमूद केल्यानूसार महागाई भत्ता तत्कालीन प्रचलित दरानुसार अदा केल्याचे संस्थेने लेखी निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे याबाबत समितीस कोणतेही निर्देश देणे आवश्यक वाटत नाही.

८. तक्रारीमधील मुद्या क्र. ८ बाबत दोन्ही पक्षांचे म्हणणे अवलोकनी घेतले असता समितीचे मत असे की, संस्था व महाविद्यालय यांनी प्राध्यापक (शिक्षक/शिक्षिका) यांना त्यांच्या जबाबदारीची कामे सोपविली जावीत, तसेच त्यांना उत्तेजन व त्यांचा विकास होणेकरिता आवश्यक त्याबाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. तथापी संस्थेने तक्रारदार यांची सेवासमाप्ती केल्यामुळे हा मुद्या विचारार्थ राहत नाही. सबब समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. संस्थेने तक्रारदार यांना सन २०१३ ते सन २०१८ पर्यंत देण्यात आलेल्या वेतनवाढीच्या फरकाची पुर्वलक्षी प्रभावाने येणारी रक्कम निकाल प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत अदा करावी.

२. तक्रारदार यांच्या इतर मागण्या त्या आता सेवेत नसल्यामुळे केवळ परिणामकारक होणार नाही. करीता तशा सुचना संस्थेस करणे अयोग्य वाटल्याने इतर मागण्या फेटाळण्यात येत आहेत.

दिनांक : 24 AUG 2021

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य सचिवा
(श्रीमती ए.ए. कदम)

सदस्य
(डॉ. व्ही. डी. नांदवडेकर )

सदस्य
(श्री.ए.ए. कुलकर्णी )

सदस्य
(श्री. आर.बी.तुपे )

सदस्य
(डॉ.एन.बी.गायकवाड)

अध्यक्ष
(श्री.एस.पी.कुलकर्णी)